किं.दि.अ.क्र. २७/२०२०
जुना कि.दि.अ.क्र. ३५/२०१७
शोभा व इतर वि. गणेश व इतर
निशाणी क्र. २४ क्रमश :

**अर्जदारा तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुढील सरतपास अर्जदाराचे वकिल श्री. पी.एस.पागृत यांचे मार्फत.**

३. मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे.

४. आम्ही या प्रकरणात निशाणी ३ या कागदपत्रांच्या यादीसोबत अ.क्र. १ ला विठ्ठलराव पंढरी हागे यांचे मृत्युप्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २७** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. २ ला विठ्ठलराव पंढरी हागे यांच्या मृत्युबाबतच्या शोक संदेशाची निमंत्रण पत्रीका दाखल केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २८** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. ३ व ४ ला आम्हा अर्जदारांच्या आधारकार्डच्या पडताळणीकृत प्रती दाखल केल्या आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी २९ व ३०** देण्यात येते.

५. तसेच आम्ही निशाणी २६ या कागदपत्राच्या यादीसोबत दिनांक ०७.०९.२०२४ रोजी दैनिक सायरन या वृत्तपत्रात दिलेली जाहीर नोटीस व त्या दैनिकाने दिलेली देयक पावती दाखल केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर जाहीर नोटीसीला **निशाणी ३१** व देयक पावतीला **आर्टीकल अ** देण्यात येते.
**सरतपास संपला.**

**गैरअर्जदार व त्यांच्या वकिलांच्या नावांचा पुकारा केला असता ते गैरहजर, सबब उलटतपास काही नाही.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दि. १३.११.२०२४.

( महेश एस. काळे )
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**